ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - III JULY - SEPTEMBER - 2020

ENGLISH PART - II / MARATHI

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | समकालीन भारतीय लोकप्रशासन<br>**प्रा. डॉ. अमोल काळे** | १-८ |
| २ | कोरोना महामारी आणि कामगारांचे जीवन<br>**डॉ. भालेराव जे. के.** | ९-१२ |
| ३ | कोविड - १९ च्या काळात स्मार्टफोनच्या वापरामुळे समाजावार झालेला सकारात्मक परिणाम<br>**प्रा. इंद्रजित नितीनराव बंगाळे** | १३-१६ |
| ४ | कोविड - १९ व शेतकऱ्यांची स्थिती<br>**प्रा. डॉ. जगदीश दयासागर हेंडवे** | १७-२१ |
| ५ | ऑनलाईन शिक्षण : चिंतन आणि चिंता<br>**प्रा. डॉ. काशिलिंग रघूनाथ गावडे** | २२-२७ |
| ६ | कोविड - १९ या महामारीबद्दल भारतीय समाजामध्ये जनजागृती करण्याकरिता<br>प्रसारमाध्यमातून जाहिरातींचा सकारात्मक वापर<br>**प्रा. कृष्णा गणपत सावंत** | २८-३२ |
| ७ | गाव ग्रामसभा प्रशासनातुन शाश्वत गाव विकास<br>**प्रा. डॉ. कुंदन एस. दुफारे**<br>**प्रा.डॉ. विणा एम जंबेवार** | ३३-३७ |
| ८ | कृषिविकासासाठी आधुनिक सिंचनाची गरज<br>**प्रोफेसर डॉ. मदन राधाकिसन शिंदे** | ३८-४१ |
| ९ | भारतीय प्रशासनाची विकासात्मक वाटचाल<br>**डॉ. पिनाटे किरण प्रल्हादराव** | ४२-४५ |
| १० | कोविड - १९ चा भारतीय समाजावर व जाहिरातीवर होणारा प्रभाव<br>**श्री. रामचंद्र नारायण चौरे**<br>**प्रा. डॉ. शिरीष अंबेकर** | ४६-४८ |
| ११ | भारताची आर्थिक-सामाजिक परिस्थिती<br>(सन २०२० मधील कोरोना विषाणू काळातील एक विश्लेषणात्मक अध्ययन)<br>**प्रा. डॉ. रवी एस . सोरते** | ४९-५४ |

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २४ | नागरिकत्व सुधारणा कायदा २०१९<br>**प्रा. डॉ. बी. बी. लोखंडे** | ११४-१२० |
| २५ | उपेक्षित समाजाचे साहित्य<br>**प्रा. डॉ. भास्कर मुरलीधर आहिरे** | १२१-१२३ |
| २६ | माहिती तंत्रज्ञानाची लोकप्रशासनातील भुमीका<br>**प्रा. जगन्नाथ विठ्ठलराव पटाईत** | १२४-१२६ |

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# २६. माहिती तंत्रज्ञानाची लोकप्रशासनातील भुमीका

**प्रा. जगन्नाथ विठ्ठलराव पटाईत**
वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाटोदा, जि. बीड.

**प्रस्तावना**

माहिती तंत्रज्ञान क्रांतीने मानवी जिवनात विशेषत : लोकप्रशासनात जलद अमुलाग्र बदल घडुन आणले आहेत. शासन आणि प्रशासन यांचा सबंध प्रत्यक्ष जनतेशी निर्मान होऊ लागला आणि अनेक नविन संचार माध्यमे निर्माण होऊ लागली. ह्या सर्व संचार साधनांणी विशेषत: इलेक्ट्रॉनिक साधनांनी लोकप्रशासनाला विविध दृष्टीकोनातुन प्रभावित केले आहे. समाजाच्या परिपुर्ण विकासासाठी माहिती एक आवश्यक आणि महत्वपुर्ण आधार आहे. युनोस्कोनुसार माहिती तंत्रज्ञानाच्या अंतर्गत वैज्ञानिक,तांत्रिक व अभियांत्रिकी विषया शिवाय व्यवस्थापण तंत्र  व संगणक विषयांच्या सबंधाचा समावेश होतो. माहिती तंत्रज्ञानाच्या अशा विविधांगी परिवर्तनामुळे माहिती व्यवस्थापणाला एक नविन दिशा प्राप्त झाली आहे. परंपरागत प्रशासनाचे स्थान गव्हर्नन्स घेत आहे आणि आज आपण ई-गव्हर्नन्स ची चर्चा करत आहोत. ई-गव्हर्नन्सच्या अंतर्गत असणाऱ्या सर्वच घटकांना 'ऑनलाईन' उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया गतिमान बनली आहे.

थोडक्यात माहिती तंत्रज्ञानाच्या उदय व विकासामुळे लोकप्रशासन 'गुड-गव्हर्नन्स' मध्ये परावर्तीत होत आहे.

**माहिती तंत्रज्ञानाची लोकप्रशासनातील भूमीका**

भारतीय लोकप्रशासनातील ई-लोकशाही, ई-प्रशासन, ई-एज्युकेशन, ई-न्यायालये,ई-मेल, ई-बँकींग, ई-कॉमर्स, ई-पोस्ट अशा विविध कार्यप्रणलीच्या माध्यमातुन एक नविन दिशा प्राप्त झाली आहे. माहिती तंत्रज्ञनातील क्रांतीद्वारे इलेक्ट्रॉनिक मेलचे अगमण झाल्यामुळे कोणतेही पत्र, स्मरणपत्र निविदा किंवा जाहिरात इत्यादी टंकलिखित करुण कोणत्याही प्रशासकीय कर्मचारी अधिकाऱ्यापर्यंत काहि क्षणात पोहचविण्यात येते. रेडिओ डेटा पेजिंग सेवा आकाशवाणीच्या एफ.एम. ट्रान्समिटरच्या द्वारे निवडक शहरात इलेक्ट्रॉनिक कार्पोरेशनच्या सहयोगाने चालवली जात आहे. या माध्यमातुन सुध्दा कोणताही संदेश कोणत्याही कार्यालयात सहज पाठविता येतो मोबाईल किंवा सेलुलर फोन प्रमाणेच सॅटॅलाईट फोन माहिती तंत्रज्ञानाची अनन्य साधारण उपलब्ध आहे. ई-फॅक्सची सुविधा इलेक्ट्रॉनिक डेटा इंटरचेंजच्या माध्यमातुन उपलब्ध होऊ शकते. काणत्याही स्वरुपातील दस्ताऐवज एका स्थानावरुन निश्चित स्थानावर पोहचविता येतात. लोकप्रशासनातील कर्मचारी व अधिकारी नविन तयार होणारे नियम, उपनियम वा प्रशासकिय विधि क्षेत्रातील वेळोवेळी होणाऱ्या परिवर्तनाशी सबंधित दस्ताऐवज या माध्यमातुन एकमेकांना सहज पाठवु शकतात. मानवाच्या व्यापारी क्षेत्रातील क्रिया प्रतिक्रीया मानवी सभ्यते इतक्याच जुन्या आहेत परंतु जग खुप बदललेले आहे. आता व्यक्तिला आपल्या दैनंदिन व्यवस्थेतुन डिपार्टमेंट स्टोअर,बँक,शेअर बाजार

किंवा वित्तीय संस्था पर्यंत ये-जा करण्याचा त्रास घेण्याची आवश्यकता नाही. ई-कॉमर्सच्या माध्यमातुन स्मार्ट कार्डाच्या आधारे सर्व व्यवहार घर बसल्या करता येतात.

एकंदरीत ई-कॉमर्सद्वारे प्रशासनाचे व्यवहारीक स्वरुप बदलत आहे. माहिती तंत्रज्ञाने संगणक इंटरनेट तसेच ई-मेल, ई-माध्यमांनी व्यक्ति व प्रशासनाला जवळ आणले असुन प्रशासन पारदर्शी बनत चालले आहे. अर्थात 'पारदर्शी प्रशासन पारदर्शी कारभार' ही कल्पना साकार होत आहे. व्यक्तिला त्याच्या कामकाजाच्या सबंधित माहिती ऑनलाईनद्वारे मिळत आहे. त्यामुळे त्याचा वेळ, पैसा व शक्तिची बचत होत आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या उपयोगामुळे शासकिय कार्यालये व कागदी प्रशासन विना कागदी कार्यालयात परावर्तीत होत आहे. शासकीय कार्यालयातील लालफित शाहित अडकलेल्या फाईल आत्ता बघायला मिळणार नाहीत. फाईलशिवाय कार्यालय होत असल्यामुळे लालफित शाहिचे प्रमाण कमी होत आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या लोकप्रशासनावरील प्रभावामुळे व जास्तीत जास्त अवलंबामुळे नोकरशाहीच्या पदसोपांत परंपरेतील पायऱ्या कमी होऊन प्रशासकीय संघटना संतुलीत बनत आहेत लोकप्रशासनाला आवश्यक असलेली योग्य माहिती आणि आकडेवारी प्राप्त करणे माहिती तंत्रज्ञानामुळे सहज शक्य झाले आहे. गुड-गव्हर्नन्स करिता माहितीची अविरत उपलब्धी आणि पारदर्शकता हे आवश्यक घटक आहेत. लोकांच्या आणि लोकांसाठी असलेल्या प्रशासनात उत्तरदायीत्व व पारदर्शकता असणे अवश्यक असते. परंपरागत भारतीय प्रशासनाला लोकाभिमुख प्रशासनाच्या स्वरुपात साकार करण्यासाठी माहिती तंत्रज्ञाची विविध उपकरणे व साधणे अत्यंतिक साहाय्यकारी ठरतात. इंटरनेटच्या माध्यमातुन माहितीच्या अधिकाराला प्रभाविपणे पोहचविण्याचे अत्यंत सायीचे झाले आहे. इंटरनेटद्वारे शासकिय माहिती व आकडेवारी सामान्य माणसांना सहज उपलब्ध होत आहे.

अर्थात अधुनिक काळात नोकर शाहिवर लोकनियंत्रन अधिक प्रभावीपणे बनत आहे. देवांग मेहता यांच्या मते माहिती तंत्रज्ञाच्या अवलंबामुळे स्मार्ट गव्हर्मेंटच्या निर्मितीची शक्यता वाढली आहे. विविध शासकिय योजनांच्या योग्य अंमलबजावणीचे कार्य संगणक व इंटरनेटच्या माध्यमातुन होत आहे. न्यायालयीन प्रक्रियेकरिता ई-न्यायालय शिक्षणाकरिता ई-एज्युकेशन व पोलिस चौकीत ई-एफ.आय.आर. आदि सुविधांचा अवलंब होत आहे. एक बाब मात्र निश्चित की, माहिती तंत्रज्ञानाच्या उपयोगामुळे देवानघेवणीचा व्यवहार बंद होऊन लोकप्रशासनात गुणत्मक सुधारणा होत आहेत.

**निष्कर्ष**

माहिती तंत्रज्ञानाच्या उपयोगामुळे लोकप्रशासन लोकाभिमुख बनत आहे. लोकप्रशासनात माहिती तंत्रज्ञानाचा अवलंब म्हणजे जनतेला इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे कमीत कमी वेळेत योग्य माहिती प्राप्त करुण देणे होय. अर्थात माहिती तंत्रज्ञान ई-गव्हर्नसचा अधारस्तंभ आहे. ई-गव्हर्नस सुशासनाकडे घेऊन जाणरा एक राजमार्गच आहे. जेथे पारदर्शकतेमुळे भ्रष्टाचार कमी होणार असुन पेपरलेस प्रशासनाच्या निर्मितीमुळे पर्यावरणाचे संरक्षण होणार आहे. तसेच घरबसल्या आपल्या समस्या आणि शासन यांमध्ये सुसंवाद स्थापन करता येणार आहे. ई-प्रशासनासाठी राजकीय नेत्यांचे समर्थन आणि तत्पर नोकरशाहिची आवश्यकता असते परंतु नोकरशाहिच्या स्वरुपाला परावर्तीत करणे कठीण कार्य आहे. संगणकीकृत शासकीय कार्यालयाची निर्मिती म्हणजे लोकाभिमुख प्रशासन नव्हे कित्येक शासकिय कार्यालयात ह्या सुविधा अनेक वर्षापासुन उपब्ध आहेत. परुतु

अजुनही तेथिल कामकाज कागदावरच चालते आहे. ज्या ठिकाणी सर्व प्रशासकिय कार्य ऑनलाईन होत असेल आणि नवनविन संशाधनातुन ती माहिती अद्ययावत केली जात असेल त्या प्रशासनाला ई-प्रशासन म्हणता येईल.

ई-प्रशासनाची यशस्वीता ही माहीती कशी, किती व अद्ययावत आहे काय तसेच माहितीचा उपयोग कोणत्या पध्दतीने होत आहे यावर अवलंबुन आहे. ई-प्रशासन म्हणजे स्मार्ट प्रशासनाची निर्मीती होय. अर्थात ई-प्रशासनात स्मार्ट प्रशासनाच्या आधारवर ई-प्रशासनाची यशस्वीता अवलंबुन आहे.

**संदर्भ**

१. कुमार, मुनेश., सुचना ताकनिकी एवं रक्षा तंत्र, डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस प्रा.लि. नई दिल्ली-२०१२.

२. फडिया, बी.एल., लोकप्रशासन, साहित्यभवन पब्लिकेशन, आगरा-२००९.

३. साबले, द्वारकाप्रसाद., लोकप्रशासन, अटलांटिक पब्लिशर्स, नई दिल्ली-२०१०.

४. पाटिल, बी.बी., लोकप्रशासन, फाडके प्रकाशन, कोल्हापुर-२०१०.

५. कानेटकर, मेधा., माहितीचा अधिकार आणि सायबर कायदा, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर-२०१३.

६. पाटिल, व्हि.बी., समग्र लोकप्रशासन, के.सागर पब्लिकेशन,पुणे-२००९.